सेवावर्धिनी

# वार्षिक अहवाल २०१८ - १९

सेवावर्धिनी























सेवावर्धिनीच्या स्थापनेला २१ वर्ष पूर्ण झाली आहेत. दोन दशकांच्या या प्रवासात सेवाभावी संस्थाना पूरक सेवा पुरविणे या मूळ हेतू बरोबरच विविध आयामांवर सेवाभावी संस्थाना सोबत घेऊन सेवावर्धिनीचा कार्य विस्तार व क्षेत्र विस्तार होत आहे. सेवासंस्था, सामाजिक उत्तरदायित्व निधी उपलब्ध करून देणाऱ्या उद्योग जगतातील नामवंत कंपन्या यांच्या सेवावर्धिनीकडून असलेल्या वाढत्या अपेक्षा, विविध व नवनवीन सामाजिक समस्यांचे अध्ययन करून त्यावरील उपाय योजना सुचविण्याचा समाजधुरीणांचा वाढता आग्रह या सर्वाची सेवावर्धिनीला पूर्ण जाणीव आहे.

मार्गदर्शक विश्वस्त मंडळ, सक्रीय कार्यकारी मंडळ, सेवा तत्पर कर्मचारी वर्ग, तज्ञ मंडळी व हितचिंतक या सर्वांच्या योगदानाशिवाय हे आव्हान पेलणे शक्य नाही. या सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करून २०१८ – १९ चा अपेक्षा उंचावणारा अहवाल सादर करताना मनस्वी आनंद होत आहे.

सोमदत्त पटवर्धन

कार्यवाह, सेवावर्धिनी

# सेवावर्धिनी

सेवावर्धिनीची स्थापना १९९८ साली झाली. सेवावर्धिनी ही नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था असून अन्य सेवासंस्थांना पूरक सेवा देण्याचे काम करत आहे. आरोग्य, शिक्षण, स्वावलंबन, सामाजिक संघटन, ग्रामविकास, जलसंधारण, कृषी या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या देशभरातील विविध संस्थांना नोंदणी व संस्था संचालन, अहवाल, प्रकल्प लेखन (Project writing), विकासाच्या विविध विषयांवरील माहितीच्या कार्यशाळा, शासकीय योजनांची सांगड घालून देणे अशा अनेकविध सेवा व मार्गदर्शन गेल्या २१ वर्षांपासून देत आहे.

सेवावर्धिनीचे कार्यकर्ते अनेक सामाजिक प्रश्नांशी संबंधित प्रकल्पावर काम करत आहेत. हे प्रकल्प योग्य पद्धतीने पूर्ण करण्यासाठी सर्वेक्षण, प्रश्नांची निश्चिती करून त्यावर उपाययोजना ठरवणे, विषयाशी निगडीत तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेणे, तांत्रिक सहाय्य उपलब्ध करणे, प्रकल्प राबवण्यासाठी रचना करणे इ. कामे सेवावर्धिनी करते. सामाजिक प्रश्नांची जाणीव व ते प्रश्न सोडवण्यासाठीची तळमळ असणारा मोठा स्वयंसेवकांचा गट समाजात आहे केवळ त्यांच्या सहकार्यानेच हे व असे अनेक प्रकल्प यशस्वी करणे सेवावर्धिनीस शक्य झाले आहे.

सेवावर्धिनी

## ध्येय

- ध्येयप्रेरित व समर्पित कार्यकर्ते आणि सामाजिक संस्थांच्या सामुहिक प्रयत्नांमधून बलशाली समाज उभा करणे.

## ध्येयपथ

- सेवाक्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे सबलीकरण करणे.
- सामुहिक प्रयत्नांमधून विकासोन्मुखी कार्यक्रमांच्या आधारे व्यापक सामाजिक उत्कर्षासाठी प्रयत्न करणे.
- लोकसहभागातून सामाजिक विश्वासाचे वातावरण निर्माण करणे.


## उद्दिष्टे

- सामाजिक विकासाच्या माध्यमातून लक्षावधी देशबांधवांचा जीवनस्तर उंचावण्यासाठी, त्यांच्या प्रश्नांवर व्यवहार्य उपाय योजना अमलात आणण्यासाठी स्वयंस्फुर्तीने प्रत्यक्ष काम करणाऱ्या सेवा संस्थाना प्रोस्ताहित व मदत करणे.

## मूल्ये

- पूर्ण समर्पित व ध्येय प्रेरित होऊन काम करणे
- पारदर्शकता
- आधुनिक व व्यावसायिक दृष्टीकोन
- राष्ट्रीय एकता व समरसता
- वंश, पंथ, जात, धर्म, रंग, वय, लिंग व शिक्षण निरपेक्षता
- सर्व वैधानिक व कायदेशीर गोष्टींची पूर्तता

# संस्था रचना



सल्लागार मंडळ
विश्वस्त मंडळ
कार्यकारी मंडळ
मुख्य कार्यकारी अधिकारी
मुख्य व्यवस्थापक
प्रकल्प व्यवस्थापक
लेखापाल
प्रकल्प समन्वयक (४)
प्रकल्प समन्वयक (४)
प्रकल्प सहाय्यक (२)
प्रकल्प सहाय्यक (१)

## मानद अध्यक्ष

मा. श्री. प्रमोद जी चौधरी
संस्थापक व कार्यकारी अध्यक्ष प्राज इंडस्ट्रीज लि.

## विश्वस्त मंडळ

मा. डॉ. उपेंद्र कुलकर्णी
मा. तुकाराम नाईक
मा. किशोर देसाई
मा. सोमदत्त पटवर्धन

## कार्यकारी मंडळ

| | |
|---|---|
| श्री. किशोर देसाई | कार्याध्यक्ष |
| श्री. सोमदत्त पटवर्धन | कार्यवाह |
| श्री. अनिल व्यास | सहकार्यवाह |
| श्री. प्रशांत मोराणकर | सहकार्यवाह |
| सौ. माणिक दामले | सहकार्यवाह |
| श्री. उदय कुलकर्णी | सहकार्यवाह |
| श्री. जयंत काकतकर | कोषाध्यक्ष |
| श्री. चंद्रशेखर कुलकर्णी | कार्यकारिणी सदस्य |
| सौ. पद्मा कुबेर | कार्यकारिणी सदस्य |
| श्री. जयराम फणसळकर | कार्यकारिणी सदस्य |
| श्री. देवदत्त टेंभेकर | कार्यकारिणी सदस्य |
| श्री. योगेश्वर गर्गे | कार्यकारिणी सदस्य |
| श्री. प्रमोद कुलकर्णी | निमंत्रित सदस्य |

# सेवावर्धिनी



## संस्था सक्षमीकरण



## अभिनव प्रकल्प

सेवावर्धिनी

# संस्था सक्षमीकरण - पूरक सेवा

- PRA, सर्वेक्षण
- अभिलेखन (Documentation)
- मूल्यांकन (Evaluation)
- संसाधन उभारणी (Resource Mobilization)
- संस्था संचालन प्रशिक्षण







# अभिनव प्रकल्प

- ग्राम विकास
- जल संधारण
- उपजीविका
- शिक्षण
- कचरा व्यवस्थापन
- सामाजिक विकास







# संस्था सक्षमीकरण

संस्था संचालन, अहवाल लेखन, प्रकल्प प्रस्ताव लेखन (Project writing), हिशोब व्यवस्थापन, विकासाच्या विविध विषयांवरील माहितीच्या कार्यशाळा, CSR शी जोडून देणे, शासकीय योजनांची सांगड घालून देणे अशा अनेकविध सेवा यासाठी गेली ३ वर्ष सेवावर्धिनी पुढील संस्थाना सतत मार्गदर्शन करत आहे.

| संस्था | स्थान | कामाचा विषय |
|---|---|---|
| माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान | सांगोला, सोलापूर | महिला आणि बाल कल्याण |
| नीड | खैरगाव, यवतमाळ | शिक्षण, महिला सक्षमीकरण |
| भगिनी निवेदिता प्रतिष्ठान | सांगली | महिला सक्षमीकरण |
| संपूर्ण बांबू केंद्र | लवादा, धारणी, अमरावती | रोजगार निर्मिती |
| हिंदुस्तान जागरण | पुणे | सामाजिक विकास |
| स्व. बाबुराव दौंडकर स्मारक समिती | रांजणगाव, ता. शिरूर, जि. पुणे | ग्राम विकास |

# संस्था सक्षमीकरण

सेवावर्धिनी

महाराष्ट्र राज्य चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक महामंडळ त्यांच्या CSR अंतर्गत तळागाळात काम करणाऱ्या विविध सामाजिक संस्थाना दरवर्षी निधी उपलब्ध करून देते. यामध्ये मागील ३ वर्षे सेवावर्धिनी समन्वयाचे काम करत आहे. मागील ३ वर्षात सेवावर्धिनीच्या संपर्कातील एकूण ७२ संस्थांना प्रत्येकी किमान रु. दोन लाख एवढा निधी उपलब्ध झाला. या सर्व संस्थांशी चर्चा आणि संस्थांनी केलेल्या कामाचा आढावा घेण्यासाठी एका कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

- दिनांक – २२ जून २०१८
- स्थान – रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई
- या कार्यक्रमाला मा. ना. विनोद जी तावडे – मंत्री सांस्कृतिक कार्य. महाराष्ट्र राज्य, मा. भरत व्यास – धर्मादाय उपायुक्त, मा. मिलिंद लेले – संचालक, चित्रपट रंगभूमी इत्यादी मान्यवर उपस्थित होते.
- या कार्यक्रमात CSR निधी मिळालेल्या ५ संस्थांच्या प्रकल्पांचे सादरीकरण झाले.
- मा. ना. विनोद जी तावडे यांनी प्रश्नोत्तरांच्या मार्फत कार्यकर्त्यांशी चर्चा केली.
- मा. भरत व्यास यांनी सामाजिक संस्थां आणि शासन यांच्यातील कामाची प्रत्यक्ष कार्यवाही, त्यात येणाऱ्या अडचणी आणि शासकीय व्यवस्था काय उपाययोजना करू शकेल या आणि अशा अनेक विषयांवर चर्चा केली. यामध्ये सामाजिक संस्थांचे प्रश्न त्यांनी जाणून घेतले.
- कार्यक्रमानंतर सर्व सहभागींना फिल्मसिटी दाखविण्याची व्यवस्था करण्यात आली होती.
- या कार्यक्रमाला एकूण ६५ संस्थांचे १३५ प्रतिनिधी उपस्थित होते.

# Assignments

Pre feasibility survey

- स्थान – रघुनाथपूरम, जि. रामनद, तामिळनाडू
- हेतू – समाजोपयोगी काम करण्यासाठी प्रकल्पपूर्व अभ्यास करून गावाच्या गरजा जाणून घेणे
- फंडिंग एजन्सी – ONGC
- गावातील १३ वाड्यांचा अभ्यास केला.
- अभ्यासाचे विषय – आरोग्य, शिक्षण, महिला सबलीकरण, शेती, पाणी, उर्जा
- हा अभ्यास करण्यासाठी एकूण ७ प्रवास केले.
- तज्ञांचे प्रवास – डॉ. वडगबाळकर, भूगर्भ तज्ञ; मा. योगेश्वर गर्गे, निवृत्त अभियंता, पाटबंधारे विभाग





सेवावर्धिनी

# Assignments

## Impact Assessment

- स्थान – तळपेवाडी व माळेगाव, ता. मावळ, जि. पुणे
- हेतू – CSR मार्फत चालणाऱ्या फिरता दवाखाना प्रकल्पाची उपयोगिता जाणून घेणे
- फंडिंग एजन्सी – महिंद्रा & महिंद्रा स्पेअर्स बिझनेस युनिट
- सहयोगी संस्था – सेवा आरोग्य फौंडेशन
- प्रकल्पाचा कालावधी – फेब्रुवारी २०१९
- महिंद्रा & महिंद्रा स्पेअर्स बिझनेस युनिट कंपनीतर्फे चालवल्या जाणाऱ्या फिरत्या दवाखान्याची प्रत्यक्ष पाहणी केली.
- दोन्ही गावात मिळून ५० घरी सर्वेक्षण केले.






# सेवा दिशा

सेवावर्धिनी

- राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व ८ मातृसंस्थांद्वारे चालणाऱ्या भारतभरातील सर्व सेवा प्रकल्पाचे वृत्त **सेवा दिशा २०१९** या नावाने हिंदी व इंग्रजी मध्ये संकलित केले गेले.
- सेवावर्धिनीने यामध्ये समन्वयक, संकलक व सादरकर्ता म्हणून काम केले.
- वृत्त संकलनासाठी एक मोबाईल एप्लिकेशन तयार केले होते. भारतभरातील प्रांत स्तरावरच्या काही कार्यकर्त्यांना मुंबई, दिल्ली व कोलकाता येथे त्याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले.
- मातृसंस्थांच्या प्रतिनिधींना पुण्यामध्ये एकदिवसीय प्रशिक्षणासाठी बोलावले.
- वनवासी कल्याण आश्रम व विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांना शिर्डी, पुणे आणि खरगपूर येथे प्रशिक्षण दिले.
- एकूण १,३०,०३२ प्रकल्पांचे सर्वेक्षण झाले, त्याचे विश्लेषण करून प्रकाशित करण्यात आले.
- एकूण २०६६२ जणांची सर्वेक्षण म्हणून नोंद केली गेली.
- याबरोबर सेवाकार्याची माहिती देणारे काही लेख या अंकात आहेत. आजच्या जगात समाजसेवेचे महत्व सांगणारे भारतातील ५ मान्यवरांचे परिसंवादात्मक लेखही या अंकात प्रकाशित केले आहेत.






# संवाद बैठक

सेवावर्धिनी

- हेतू – सेवावर्धिनीच्या सहयोगी संस्थाच्या बरोबर संवादातून त्यांच्या अपेक्षा व सेवावर्धिनीच्या संस्थांकडून अपेक्षा यावर चर्चा करून पुढील नियोजन करणे.
- स्थान – स्वातंत्र्यवीर सावरकर अध्यसन केंद्र, डेक्कन, कर्वे रस्ता, पुणे
- दिनांक : ८ सप्टेंबर २०१८
- या बैठकीत झालेली सत्र -
  - ✓ सत्र १ – सेवावर्धिनीची संकल्पना आणि वाटचाल
  - ✓ सत्र २ - संस्थांच्या कार्यकर्त्यांना सेवावर्धिनीकडून असलेल्या अपेक्षा विचारल्या असता कुठल्या विषयांवर सेवावर्धिनीकडून मार्गदर्शन मिळावे यावर चर्चा झाली.
  - ✓ सत्र ३ – सेवाकार्याचे बदलते स्वरूप, आगामी दिशा
  - ✓ सत्र ४ – सेवावर्धिनीच्या संस्थांकडून अपेक्षा
  - ✓ समारोप सत्र – बैठकीचा समारोप मा. यशोवर्धनजी (अण्णा) वाळिंबे, प्रांत प्रचारक यांनी केला.

| | |
|---|---|
| उपस्थित संस्था | ३७ |
| कार्यकर्ते | ६५ |
| जिल्हे | १७ |

# ग्रामविकास – काळदरी, ता. पुरंदर, जि. पुणे

सेवावर्धिनी

### ग्रामीण रोजगार कार्यशाळा

- हेतू – स्थानिक महिलांना बचत गट सुरु करून रोजगार मिळवण्यासाठी प्रवृत्त करणे
- फंडिंग एजन्सी – रोटरी इंटरनॅशनल व पुण्यातील सहयोगी क्लब
- सहयोगी संस्था – ग्रामपंचायत काळदरी
- दिनांक – २५ नोव्हेंबर २०१८
- मार्गदर्शक – डॉ. प्रसाद देवधर - भगीरथ ग्राम विकास प्रतिष्ठान, झाराप, सिंधुदुर्ग व मा. कैलास जाधव – डेअरी तज्ञ
- १५ महिलांचा एक बचत गट सुरु, त्यांनी केलेल्या उत्पादनांची विक्री

### स्वच्छता व जल साक्षरता – जाणीव जागृती कार्यक्रम

- फंडिंग एजन्सी – रोटरी क्लब ऑफ शनिवारवाडा आणि पुणे मेट्रो
- दिनांक २३ मे २०१८
- गावातील १३० नागरिक उपस्थित होते.





# ग्राम विकास

सेवावर्धिनी

## PRA प्रशिक्षण

- स्थान – जांभिवली, ता. कर्जत, जि. रायगड
- सेवा सहयोग, मुंबईच्या कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण
- कालावधी - १४, १५ जून २०१८
- उपस्थिती – २७ कार्यकर्ते

## NSS कॅम्प

- स्थान – मांढर, ता. पुरंदर, जि. पुणे
- सहयोगी संस्था – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि COEP
- कालावधी – २१ ते २६ जानेवारी २०१९
- एकूण ६० विद्यार्थी सहभागी

## सायकल वाटप

- स्थान – मांढर, ता. पुरंदर, जि. पुणे
- फंडिंग एजन्सी – मा. राहुल व अश्विनी इनामके
- गावातील २५ विद्यार्थ्यांना सायकल दिल्या.

## वाचनालय

- स्वामी विवेकानंद वाचनालय – कोचळेवाडी, डॉ. अब्दुल कलाम वाचनालय - बालेघर
- हेतू – गावातील नागरिकांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी व संस्कारक्षम वाचनासाठी उपयुक्त पुस्तके उपलब्ध व्हावीत.
- फंडिंग एजन्सी – इमर्सन
- सहयोगी संस्था – ग्रामपंचायत कोचळेवाडी, ग्रामपंचायत बालेघर
- दोन्ही गावांमध्ये मिळून ५०० पुस्तके आणि प्रत्येकी १ कपाट दिले.
- पाठपुरावा –
  - ✓ गावातील नागरिकांचा वाचन संबंधी पाठपुरावा.
  - ✓ कोचळेवाडी येथील पुस्तकांची संख्या वाढली

# ग्राम विकास

- स्थान – दिवड, ता. मावळ, जि. पुणे
- हेतू – दिवड गावात सांडपाणी निचरा करण्यासाठी भूमिगत सिमेंट कॉंक्रीट व्यवस्था उभी करणे.
- फंडिंग एजन्सी – ZS असोसिएट्स, पुणे
- दिवड गावामध्ये सिमेंट कॉंक्रीट पाईपच्या सहाय्याने सांडपाणी निचरा व व्यवस्थापन केले.
- भूमिपूजन – दिनांक १३ मार्च २०१९ रोजी प्रकल्पाचे भूमिपूजन झाले.
- मान्यवर भेटी – मा. सचिन बांगरे, ZS असोसिएट्स; मा. अमोल साळवे, सरपंच – दिवड; मा. अण्णा सावळे, माजी सरपंच





# नक्षत्र वन







- स्थान – ग्रीन थंब, फेज ३, खडकवासला धरणाशेजारी  पुणे
- फंडिंग एजन्सी – कमिन्स इंडिया, पुणे
- सहयोगी संस्था – ग्रीन थंब, पुणे
- खडकवासला येथे नक्षत्रवन उभे केले.
- भारतीय ज्योतिषशास्त्रानुसार २७ नक्षत्र आहेत, त्या प्रत्येक नक्षत्रासाठी एक मुख्य वृक्ष आहे तसेच एक पूरक वृक्ष आहे. या ५४ वृक्षांची रोपे आणून त्याचे शास्त्रीय पद्धतीने रोपण करण्यात आले.
- या निमित्ताने पर्यावरणपूरक वन उभारणीचा अनोखा अनुभव सेवावर्धिनीला मिळाला.

# जल संधारण

सेवावर्धिनी

**बसर्गे, ता. गडहिंग्लज, कोल्हापूर**

- कामाचे स्वरूप - १. नवीन सिमेंट बंधारा
  २. कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याची दुरुस्ती
  ३. गाय रानावर सलग समतल चर
- हेतू – गावातील शेतीसाठी पाणलोट क्षेत्राचा विकास
- फंडिंग एजन्सी – ONGC
- भूमिपूजन - मा. किशोर जी देसाई – कार्याध्यक्ष, सेवावर्धिनी; मा. डॉ. राजेंद्र हिरेमठ – उपाध्यक्ष, जनसेवा बँक; मा. सुरेश मणीकेरी – सरपंच, बसर्गे
- दिनांक – १६ मार्च २०१९
- एकूण लाभार्थी – सुमारे २०० शेतकरी



**पालाणे - मांढरदेव, ता. वाई, जि. सातारा**

- कामाचे स्वरूप – सिमेंट कॉंक्रीटच्या १५ लाख लिटर पाणी साठवण क्षमता असलेल्या टाकीची बांधणी
- हेतू – गावातील पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी सोय व्हावी
- फंडिंग एजन्सी – ONGC
- मान्यवर भेट – मा. संजय नंदनवार, ONGC - CSR
- भूमिपूजन –
  - ✓ दिनांक - ९ मार्च २०१९
  - ✓ उपस्थिती – सेवावर्धिनीचे अधिकारी
- एकूण लाभार्थी – सुमारे २०० नागरिक



# जल संधारण

सेवावर्धिनी

## बहिरवाडी, ता. पुरंदर, जि. पुणे

- कामाचे स्वरूप – पाझर तलाव व सिमेंट बंधारा दुरुस्ती
- हेतू – गावातील पिण्याचे पाणी साठवणे
- फंडिंग एजन्सी – रमा पुरुषोत्तम न्यास
- एकूण लाभार्थी – सुमारे १५० कुटुंब
- परिणाम – पिण्याच्या पाण्याच्या विहिरीचे पाणी वाढले.





## बालेघर, ता. वाई, जि. सातारा

- कामाचे स्वरूप – १. कासुर्डेवाडी येथे १०००० लि. क्षमतेच्या दोन फेरो सिमेंट टाक्यांची बांधणी
  २. शिवकालीन विहिरीची पुनर्बांधणी व दुरुस्ती
- हेतू – गावातील पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी सोय व्हावी
- फंडिंग एजन्सी – शोगिनी टेक्नोआर्ट्स प्रायव्हेट लि., खेड व ॲटलास कॉप्को, बेल्जियम
- सहयोगी संस्था – जलवर्धिनी संस्था, ठाणे
- एकूण लाभार्थी – सुमारे २५० कुटुंब
- भूमिपूजन –
  - ✓ दिनांक - ९ मार्च २०१९
  - ✓ उपस्थिती – सेवावर्धिनीचे अधिकारी



# जलदूत

- प्रस्तावना - जलदूत १.० हा प्रकल्प नोव्हेंबर २०१७ मध्ये पूर्ण झाला. या कामासाठी Atlas Copco Charitable Foundation च्या Water for All मधून आर्थिक सहकार्य करण्यात आले होते.
- Atlas Copco Charitable Foundation ने प्रकल्पाचे मूल्यमापन करण्यासाठी त्रयस्थ समितीची नेमणूक केली.
- समिती सदस्य - श्री. शशांक देशपांडे - निवृत्त वरिष्ठ भूजल वैज्ञानिक, श्री. शिरीष तेरखेडकर - शेती तज्ञ तसेच श्री. जयंत पाटील - पाणलोट तज्ञ यांचा सहभाग होता.
- मूल्यमापन कालावधी - जून २०१८ ते ऑगस्ट २०१८
- अंतर्गत झालेले उपक्रम -
  - ✓ २४ गावांपैकी ६ गावांना भेटी झाल्या, ज्यात प्रत्यक्ष कामांची पाहणी व ग्रामस्थांशी चर्चा झाली.
  - ✓ दि. ११ ऑगस्टला अन्य गावातील जलदूतांना समितीने माहिती घेण्यासाठी बोलावले. या भेटीसाठी १४ जलदूत उपस्थित होते.
  - ✓ तज्ञांसोबत चर्चा करून, प्रकल्पामागची भूमिका, प्रशिक्षण देण्याची पध्दत, साध्य याविषयी माहिती घेतली. तसेच प्रकल्पावर झालेल्या खर्चाचीही पूर्णपणे तपासणी केली.
- अभ्यासांती समितीने प्रशिक्षणास १० पैकी ८.४ आणि प्रत्यक्ष क्षेत्रांवर केलेल्या कामांस १० पैकी ६.२ गुण दिले.
- या प्रकल्पाची गरज आणि यश याद्वारे अधोरेखित झाले तसेच समितीने पुढे करावयाच्या काही सुधारणाही सुचविल्या.
- या सूचनांनुसार जलदूत २.० या प्रकल्पाची आखणी केली. या प्रकल्पाला Atlas Copco Charitable Foundation ने २८ फेब्रुवारीला मान्यता दिली आणि १ मार्च २०१९ पासून प्रकल्पाची सुरुवात झाली.

# आशा की बूंदे

- हेतू - वर्षभर गावामध्ये स्वच्छ पिण्याचे पुरेसे उपलब्ध व्हावे यासाठी अभ्यास
- प्रकल्प प्रवर्तक संस्था – UNICEF, ACWADAM, GSDA
- क्षेत्र – आंबेगाव आणि शिरूर तालुक्यातील ३३ गावे
- अंतर्गत झालेले उपक्रम –
  - ✓ सुरवातीच्या टप्प्यात ३ गावांमध्ये काम सुरु झाले
  - ✓ या गावातील ग्राम सेवक, सरपंच, CRP आणि संस्था प्रतिनिधी यांचे प्रकल्प माहितीसाठी प्रशिक्षण आणि क्षेत्र भेट झाली.
  - ✓ १७ डिसेंबर २०१८ रोजी ३ गावांचे प्रकल्प माहिती व जल व्यवस्थापन या विषयावर प्रशिक्षण झाले.
  - ✓ या गावांमध्ये सोशल ऑडिट, जनजागृती कार्यक्रम, जलदिनानिमित्त चित्रकला स्पर्धा, भूस्तर रचना मापन, विहिरी मापन केले.
  - ✓ एका गावात स्वयंचलित वेध शाळा सुरु केली.










# सीना खोरे जलसमृद्धी अभियान

सेवावर्धिनी



- स्थान – नगर, बीड, उस्मानाबाद, सोलापूर या जिल्ह्यातील १३ तालुके
- हेतू – कायमस्वरूपी दुष्काळी असणाऱ्या सीना नदीच्या खोऱ्यामध्ये जल संधारणाच्या कार्यक्रमाद्वारे पाणलोट क्षेत्राचा विकास
- सहयोगी संस्था – सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ – औरंगाबाद, लोकसेवा समिती – उस्मानाबाद
- वरीलपैकी ३ जिल्ह्यातील ३ तालुक्यातील प्रत्येकी १ पाणलोट क्षेत्र निवडून क्षेत्राचा अभ्यास व जल संधारणाचे काम सुरु आहे.
- तज्ञांचे प्रवास – मा. योगेश्वर गर्गे - निवृत्त अभियंता, पाटबंधारे विभाग, डॉ. सुहास आजगावकर, मा. प्रसाद देशपांडे – शेती तज्ञ





# सीना खोरे जलसमृद्धी अभियान

- प्रकल्पांतर्गत झालेले उपक्रम –

| क्रमांक | उपक्रम | स्थान | कालावधी | संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | ४ जिल्ह्यांमधील कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण | जामखेड, नगर | मे २०१८ | ७० |
| २. | तालुकास्तरीय कार्यकर्ता प्रशिक्षण | आष्टी, बीड | जून २०१८ | ४० |
| ३. | तालुकास्तरीय कार्यकर्ता प्रशिक्षण | भूम, उस्मानाबाद | सप्टेंबर २०१८ | ३५ |
| ४. | तालुकास्तरीय कार्यकर्ता प्रशिक्षण | बार्शी, सोलापूर | सप्टेंबर २०१८ | ३९ |
| ५. | पाणलोट क्षेत्रातील प्रत्यक्ष काम – गाळ काढणे, नाला खोलीकरण व रुंदीकरण | आष्टी, बीड | फेब्रुवारी २०१९ | |

# भटक्या व विमुक्त जाती – जमातीतील नागरिकांचे सक्षमीकरण

सेवावर्धिनी

- हेतू – भटक्या व विमुक्त जाती – जमातीतील नागरिकांचे उपजीविकेच्या साधनांद्वारे सक्षमीकरण
- फंडिंग एजन्सी - BRLF
- सहयोगी संस्था – अभिनव भारत समाज विकास संस्था - करमाळा, उद्योगवर्धिनी - सोलापूर
- क्षेत्र – सोलापूर व उस्मानाबाद जिल्हा
- एकूण लाभार्थी - २२५ कुटुंब









# भटक्या व विमुक्त जाती – जमातीतील नागरिकांचे सक्षमीकरण

सेवावर्धिनी

- प्रकल्पांतर्गत झालेले उपक्रम –
  - ✓ गो विज्ञान अनुसंधान केंद्र, देवलापार, नागपूर येथे ७१ जणांनी गोपालन, गो संवर्धन आणि पंचगव्य उत्पादन या विषयीचे प्रशिक्षण घेतले.
  - ✓ प्रशिक्षणात शिकलेल्या वस्तूंचे प्रशिक्षणानंतर प्रत्यक्ष उत्पादन केले.
  - ✓ वडारी, कैकाडी, बहुरूपी, ओतारी, कतारी, कडबू, गोंधळी व पारधी समाजातील नागरिकांचे २५ बचत गट सुरु झाले आहेत.
  - ✓ १० बचत गटांसाठी एकूण ६ प्रशिक्षणांमधून या गटांना मसाले, उदबत्ती, उटणे, पणत्या बनविण्याचे प्रशिक्षण दिले. त्यानुसार काही गटांचे व्यवसाय सुरु झाले आणि काही गटांची बचत सुरु झाली.





# शिक्षण

सेवावर्धिनी

- हेतू – मेळघाट व यवतमाळ भागातील विद्यार्थ्यांना स्थानिक भाषेत शिक्षण घेण्याची संधी निर्माण करणे.
- फंडिंग एजन्सी – महाराष्ट्र राज्य चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक महामंडळ
- सहयोगी संस्था – नीड, यवतमाळ; संपूर्ण बांबू केंद्र, लवादा, अमरावती
- क्षेत्र – यवतमाळ व मेळघाटातील प्रत्येकी २ तालुके
- अंतर्गत झालेले उपक्रम –
  - ✓ अभ्यास वर्ग – रोजच्या तासिका
  - ✓ लोकसंस्कार शिबीर
  - ✓ कला, क्रीडा शिबीर
  - ✓ शिक्षणदूत प्रशिक्षण
- एकूण २० गावांमध्ये वर्ग
- स्थानिक कोरकू, गोंड, कोलामी भाषेमध्ये प्रत्यक्ष शिक्षण






# बाल विज्ञान मेळावा

सेवावर्धिनी

- हेतु-  विज्ञानातील विविध संकल्पना स्वत: प्रयोग करुन समजून घेऊन आत्मविश्वासाने सादर करण्याचे तंत्र ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना शिकवणे.
- फंडिंग एजन्सी - सिमेन्स गमेसा
- सहयोगी संस्था - प्रथम एज्युकेशन फौंडेशन
- क्षेत्र – उस्मानाबाद जिल्ह्यातील २० गावे, २३ शाळा
- कालावधी – जानेवारी ते मार्च २०१९
- अंतर्गत झालेले उपक्रम –
    - ✓ कोरळ व कवलदरा विभागांचे प्रशिक्षण
    - ✓ जिल्हास्तरीय बाल विज्ञान मेळावा
- एकुण १८६१ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले त्यापैकी ११५ विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय मेळाव्यात प्रयोग सादर केले.
- मान्यवर भेट – मा. दीपा मुधोळ – मुंडे, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद







# शेतकरी सक्षमीकरण

- हेतू – शेतकऱ्यांना शेतीचे व्यवस्थापन शिकवून आर्थिक सक्षम बनविणे
- सहयोगी संस्था – नीड, यवतमाळ
- क्षेत्र – खैरगाव, यवतमाळ
- सावकाराकडून कर्ज न घेता, शेतकऱ्यांना बिनव्याजी अर्थ सहाय्य उपलब्ध करून देणे
- अंतर्गत झालेले उपक्रम –
  - ✓ एकात्मिक किड व्यवस्थापन प्रशिक्षण – वक्ते मा. अमित गाडबैल
  - ✓ ३ क्षेत्र भेटी
- एकूण लाभार्थी - २५ शेतकरी







# सॅनिटरी नॅपकीन डिस्पोजल प्रकल्प

सेवावर्धिनी

- हेतू – सॅनिटरी नॅपकीन – अविघटनशील कचऱ्याची विल्हेवाट लावणे
- फंडिंग एजन्सी – ARAI
- सहयोगी संस्था – जन आधार सेवाभावी संस्था – लातूर, पूर्णम इकोव्हीजन फौंडेशन
- क्षेत्र – पुणे शहरातील प्रभाग क्रमांक ३४
- अंतर्गत झालेले उपक्रम –
  - ✓ उद्घाटन कार्यक्रम – दि. १६ फेब्रुवारी २०१९
  - ✓ जन जागृतीसाठी कार्यक्रम
- मान्यवर भेटी – मा. मंजुषा नागपुरे - नगरसेविका प्रभाग ३४, मा. भूपेंद्र टोपे – सचिव CSR, ARAI, मा. शहाडे सर – सॅनिटेशन विभाग










# अरुणोदय

सेवावर्धिनी

- हेतू- किशोरवयीन मुलांना योग्य, उपयुक्त, शास्त्रशुद्ध माहिती देणे व ही माहिती देण्यासाठी किशोरमित्र प्रशिक्षित करणे.
- फंडिंग एजन्सी – महाराष्ट्र राज्य चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक महामंडळ, लुल्ला चॅरिटेबल फौडेशन सांगली, म. कर्वे स्त्री शिक्षण संस्था पुणे, भगिनी निवेदिता प्रतिष्ठान सांगली
- सहयोगी संस्था – स्व-रूपवर्धिनी, परिवर्तन महिला संस्था, स्वानंद जनकल्याण प्रतिष्ठान, या शिवाय किशोर विकास परिषदेमध्ये ३१ संस्थांचा सहभाग
- या प्रकल्पासाठी ८ तज्ञांचा एक संच (टीम) आहे. या गटाने केलेली महत्वाची कामे –
  - ✓ योजना बैठक
  - ✓ किशोर विकास म्हणजेच दिल दोस्ती दुनियादारी आणि मी - अभ्यासक्रम निश्चिती
  - ✓ किशोर मित्र – अभ्यासक्रम निश्चिती
  - ✓ याबरोबर शारीरिक बदलांवरचा एक व्हिडिओ तयार केला.








# अरुणोदय

सेवावर्धिनी

- प्रकल्पांतर्गत झालेले उपक्रम –

| क्रमांक | उपक्रम | स्थान | कालावधी | संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | मुलींची किशोरी विकास कार्यशाळा | कामशेत | एप्रिल २०१८ | ४३ |
| २. | किशोर दर्पण कार्यशाळा | पुणे | जून २०१८ | ४२ |
| ३. | किशोर विकास परिषद | पुणे | जून २०१८ | ७८ |
| ४. | किशोर मित्र प्रशिक्षण १ (संस्था प्रतिनिधी) | पुणे | जुलै – ऑगस्ट २०१८ | २४ |
| ५. | किशोर मित्र प्रशिक्षण २ (संस्था प्रतिनिधी) | मुंबई | ऑक्टो. २०१८, जाने. २०१९ | २४ |
| ६. | दिल दोस्ती दुनियादारी – कार्यशाळा | सांगली | सप्टेंबर २०१८ | ५० |
| ७. | स्व-रूपवर्धिनी कार्यकर्ता प्रशिक्षण | पुणे | नोव्हेंबर २०१८ | ५५ |
| ८. | किशोर – किशोरी विकास कार्यशाळा | बसर्गे, कोल्हापूर | डिसेंबर २०१८ | १४५ |

# मेळघाट सपोर्ट ग्रुप

सेवावर्धिनी

- हेतू - मेळघाटातील कारागीरांसाठी रोजगार निर्मिती, त्यातून कुपोषणावर मात व बांबूपासून बनविलेल्या वस्तूंचे प्रदर्शन विक्रीतून आर्थिक सहाय्य मिळवून देणे
- सहयोगी संस्था – संपूर्ण बांबू केंद्र मेळघाट अमरावती, स्वामी विवेकानंद युवक मंडळ, केवलारी – मध्य प्रदेश
- प्रकल्पांतर्गत झालेले उपक्रम –
  १. दिनांक २५, २६ व २७ मे २०१८ रोजी विमलाबाई गरवारे शाळा, पुणे येथे कपडे व भांडी संकलनाचे अभियान केले गेले. या अभियानामध्ये सुमारे ७०० नागरिकांनी कपडे आणून दिले. हे कपडे मेळघाट व केवलारी म. प्रदेश येथे पाठविण्यात आले.
  २. मेळघाटातील कारागिरांनी बांबूपासून व केवलारी, दिंडोरी, म. प्रदेश मधील महिलांनी कापडापासून बनविलेल्या वस्तूंचे प्रदर्शन भारावून त्या वस्तूंची विक्री केली गेली.
- मान्यवर उपस्थिती – डॉ. राजेंद्र हिरेमठ, उपाध्यक्ष - जनसेवा बँक; मा. सुनील देशपांडे सचिव – संपूर्ण बांबू केंद्र, डॉ. निरुपमा देशपांडे – मेळघाट, श्री. मिलिंद पुरोहित उर्फ स्वामी देवसेवानंद






# उत्कर्ष

सेवावर्धिनी




## विद्यापीठ भागातील सेवावस्तीतील काम

- आरोग्य तपासणी शिबिर – पांडवनगर सेवावस्ती
- दिनांक - २३ डिसेंबर २०१८
- सहयोगी संस्था - सेवा आरोग्य फौंडेशन, रोटरी क्लब
- लाभार्थी - ५५ महिला
- प्रत्यक्ष कार्यक्रम – महिलांची जनकल्याण रक्तपेढीने हिमोग्लोबिन व शुगरची तपासणी
- सहभागी डॉक्टर - डॉ. आदिती देशपांडे, डॉ. उज्वला पवार, डॉ. नेहा गुंजिटे आणि डॉ. जैन
- तपासणीचे रिपोर्ट महिलांना दिले. त्याबरोबर काही औषधे दिले.
- महिलांना आरोग्याची काळजी घेण्याविषयी मार्गदर्शन देण्यात आले.



# जलमंथन – पुस्तक प्रकाशन

- हेतू – जलसंधारणाचे काम करणाऱ्या लोकांसाठी माहिती पुस्तिका प्रकाशन
- बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व महात्मा फुले कृषी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या जलसंवाद कार्यक्रमामध्ये प्रकाशन झाले.
- स्थान – बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
- हस्ते – मा. सुरेश उर्फ भय्या जोशी - सरकार्यवाह, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ; मा. डॉ. पी. पी. पाटील, कुलगुरू - बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ; मा. मधुकर जाधव, देवगिरी प्रांत संघचालक, रा. स्व. संघ; मा. मनोज कंक, अध्यक्ष, महात्मा फुले कृषी प्रतिष्ठान, औरंगाबाद.
- पुस्तक लिखाणासाठी योगदान – मा. प्रमोद काळे, निवृत्त कार्यकारी अभियंता, पाट बंधारे विभाग
- छपाई - १००० प्रती






# विशेष - वाटंबरे जलपूजन

सेवावर्धिनी

- स्थान – वाटंबरे, ता. सांगोला, जि. सोलापूर
- सेवावर्धिनीच्या **जलदूत १** प्रकल्पामधील जलदूत, मा. मधुकर पवार यांनी प्रकल्पामध्ये झालेली प्रशिक्षणे व प्रत्यक्ष केलेल्या कामातील अनुभवामधून वाटंबरे गावासाठी विशेष काम केले.
- टेंभू धरणाचे प्रस्तावित आणि प्रलंबित पाणी पाटबंधारे विभाग तसेच इतर शासकीय यंत्रणांचा पाठपुरावा करून वाटंबरे गावामध्ये आणले. यामुळे गावातील ३ तलाव भरले. सुमारे ३०० हेक्टर डाळींबाच्या बागा वाचल्या तसेच उत्पन्नही मिळाले. त्याचबरोबर स्थानिक नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला.
- एकूण लाभार्थी – १५०० नागरिक
- मा. ना. चंद्रकांत दादा पाटील, महसूल मंत्री, महाराष्ट्र यांच्या हस्ते जलपूजनाचा कार्यक्रम दि. १६ नोव्हेंबर २०१८ रोजी वाटंबरे येथे झाला. या कार्यक्रमाला सुमारे ५०० नागरिक उपस्थित होते.
- सेवावर्धिनीचे कार्याध्यक्ष मा. किशोर देसाई, कार्यवाह मा. सोमदत्त पटवर्धन, मुख्य कार्यकारी अधिकारी मा. प्रमोद कुलकर्णी व Atlas Copco च्या श्रीमती शालिनी शर्मा या कार्यक्रमात उपस्थित होते.







# विशेष – जनसेवा पुरस्कार

- जनसेवा सहकारी बँक लि. पुणे दरवर्षी वर्धापन दिनानिमित्त एका सामाजिक संस्थेला **जनसेवा पुरस्कार** देऊन सन्मानित करते.
- दिनांक २४ ऑक्टोबर २०१८ रोजी बँकेच्या ४६ व्या वर्धापन दिनानिमित्त हा पुरस्कार सेवावर्धिनीला सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.
- पुरस्काराचे स्वरूप – मानपत्र व रु. एक लाख एक हजार









# सेवावर्धिनी कर्मचारी प्रशिक्षण
## अन्य प्रशिक्षण सत्रांमध्ये सहभाग

| प्रशिक्षण | आयोजक | कालावधी | स्थळ | प्रशिक्षणातील मुद्दे | प्रशिक्षणार्थी |
|---|---|---|---|---|---|
| उमलत्या वयाशी जुळवून घेताना | ज्ञान प्रबोधिनी | २ दिवस | पुणे | किशोर विकास प्रशिक्षक प्रशिक्षण | गिरीजा सिरशीकर<br>गीता कुलकर्णी |
| Human Resource | Thermax with SVP | २ दिवस | Thermax कार्यालय, पुणे | How to manage HR in NGO | प्रमोद कुलकर्णी<br>गिरीजा सिरशीकर |
| मासिक पाळी व्यवस्थापन | समाज बंध आणि एस्सार फौंडेशन | १ दिवस | राष्ट्र सेवा दल, पुणे | प्रशिक्षक प्रशिक्षण<br>मासिक पाळी व्यवस्थापन | गिरीजा सिरशीकर<br>प्रगती भोमे |
| मनुष्यबळ व्यवस्थापन आणि संस्था बांधणी | राष्ट्रीय सेवा भारती | २ दिवस | हेडगेवार रुग्णालय, औरंगाबाद | संस्था संचालन<br>मनुष्यबळ व्यवस्थापन | माणिक दामले<br>प्रमोद कुलकर्णी<br>गीता कुलकर्णी<br>विभावरी पाचपोर |
| जल साक्षरता प्रशिक्षण | यशदा आणि WATER | ५ दिवस | दरेवाडी, ता. जि. संगमनेर | पाण्याचे अंदाजपत्रक बनविणे आणि जल साक्षरता प्रवीण कार्यकर्ता बनवणे.<br>क्षेत्र भेटी – भोजदरी, संगमनेर | गणेश बारंगळे |

# देणगीदार

सेवावर्धिनी

- महिंद्रा स्पेअर्स बिझिनेस युनिट
- ॲटलास कॉप्को (इंडिया) लि.
- ॲटलास कॉप्को, बेल्जियम
- इमर्सन
- सिमेन्स गमेसा रिन्युव्हेबल पॉवर प्रायव्हेट लि.
- रमा पुरुषोत्तम न्यास
- ओ. एन. जी. सी.
- झेड. एस. असोसिएट्स
- युनिसेफ
- महाराष्ट्र राज्य चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक महामंडळ
- रोटरी इंटरनॅशनल व अन्य क्लब
- बी. आर. एल. एफ.
- ए. आर. ए. आय
- जनसेवा सहकारी बँक लि. पुणे
- कमिन्स इंडिया लि.
- एक्सोटिक झेनिनी
- सर्व वैयक्तिक देणगीदार

# श्रद्धांजली

सेवावर्धिनी

ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात् पूर्णमुदच्यते |

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ||

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः !!!

अहवाल वर्षामध्ये भारतातील जे थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, लेखक, साहित्यिक, कलावंत, शिक्षण तज्ञ, सामाजिक कार्यकर्ते दिवंगत झाले, त्यांना नम्रतापूर्वक भावपूर्ण श्रद्धांजली.

ईश्वर मृतांच्या आत्म्यास शांती देवो..!!

सेवावर्धिनी





















